प्रकल्प सारांश

प्रस्तावित

२६ मेगावॅट सहविदयुत निर्मिती प्रकल्पाचा ई.आय.ए.संक्षिप्त प्रकल्प अहवाल.

अप्रस्तुत

मेसर्स. श्रीगोंदा सहकारी साखर कारखाना लि.

मौजे: श्रीगोंदा फॅक्टरी, तालुका: श्रीगोंदा, जि.अहमदनगर,

महाराष्ट्र.



व्दारा

**ULTRA-TECH**

**(Environmental Consultancy**

**& Laboratory Gazzeted By MoEF, NABET Approved)**

**&**

एम.के.डब्ल्यु.बायो-सिस्टीमस

श्रीगोंदा सहकारी साखर कारखाना लि.

विज प्रकल्प अहवाल

## १. प्रस्तावना

श्रीगोंदा सहकारी साखर कारखाना लि. कारखान्याचे चेअरमन मा. खा. श्री. नागवडे साहेब यांच्या तडफदार नेतृत्वाखाली साखरेच्या उत्पादनसाठी सन १९७३/७४ साली रितसर शासनाकडे नोंदणीकृत (नों. क्रं.) कडुन मौजेः श्रीगोंदा फॅक्टरी (४१३७२६) ता. श्रीगोंदा जि. अहमदनगर.महाराष्ट्र. येथे उभा केला असून सन १९७४ पासून १२५० टि.सी.डी. गाळप क्षमतेने सुरु करुन वेळोवेळी उसाच्या निर्मितीची वाढ होईल विस्तारीकरण करुन ३५०० टि. सी.डी. क्षमतेने चालत आहे.

पुरातन काळापासून साखर हा पदार्थ उपयुक्त अन्नघटक म्हणून वापरला जात आहे. वाढत असलेली जनसंख्या, अर्थप्राप्ती, उपभोगाच्या सवयी व औद्योगीकरण मुळे हॉटेल, उपहार गृह, शीतपेये याचे सर्व औद्योगीकरण झाल्यामुळे साखरेचा उपयोग मुबलक प्रमाणत होत आहे.

सध्या काळाच्या गरजेनुसार साखर कारखाना हा फक्त साखरेच्या उत्पादनावरती अवलंबून न राहता त्याच्या उपपदार्थाचा जोडधंदा फायद्याच्या दृष्टीने करणे आवश्यक आहे म्हणुन कारखान्याचे कार्यकारी संचालक मा.श्री.ए.बी.जंगले साहेब यांच्या नेतृत्वाखाली बगॅसचा (उसाच्या चिप्पाडांचा) योग्या वापर करुन कारखान्याने साखरेबरोबरच साखर कारखान्याच्या ठिकाणीच २६ मेगावॅट सहविदयुत निर्मिती प्रकल्प उभारण्याचे ठरवले आहे.

## २. प्रकल्पाची आवश्कता

महाराष्ट्र शासनाने औद्योगिक विकास जलद गतीने व्हावा यासाठी वैशिष्ट धोरणे राबविली आहेत. यामुळे औद्योगिक क्षेत्रासाठी विजेची गरज मोठयाप्रमाणात वाढलेली आहे. सध्याची विजेची गरज विजेच्या उत्पादन क्षमतेपेक्षा निश्चित जास्त आहे. त्यामुळे राज्यातील विज उत्पादन आणि विजेची मागणी यांचा मेळ घालता येत नाही. किंबहूना सद्यस्थितीतील विजेची उपलब्धता आणि भविष्यातील विज उत्पादन या विषयी शासनाने काही योजना आखल्या आहेत. क्रेंदीय विद्युत प्राधिकरणाच्या (सेंट्रल इलेक्ट्रिसिटी ॲथॉरीटी सीइअ) १७ व्या भारतीय तापद्युित सर्व्हेक्षण अहवालानुसार महाराष्ट राज्यात २००९/ १० या वर्षी १३९८८ मेगावॉट तर २०१२/१३ या वर्षीत २२९८४ मेगावॉट विजेचे मागणी होती. सन २००९/ १० साली १२३९८४ लक्ष तर सन २०१२/१३ रोजी १२४९६१ लक्ष युनिट विजेचा तुटवडा होता. सन २०१६ /१७ वर्षात ऐन गरजेचा वेळी विजेची मागणी २८३४८ मेगावॉट असणार आहे. तर विजेची उपब्धता फक्त २५१२४ मेगावॉट असणार आहे हिच मागणी सन २०१८ या वर्षी २१९.९ दशलक्ष यूनिट असणार आहे. औद्योगिकीकरण आणि इतर विकसनशील कार्यामुळे विजेची मागणी वाढणार आहे. महाराष्ट्र राज्यातील विज मागणी व भविष्यात विजेचा भासणारा तुटवडा यासाठी मेसर्स.श्री.श्रीगोंदा सहकारी साखर कारखाना लि. यांनी २६ मेगावॉट सहविज निर्मिती करुन वीज निर्मितीत हातभार लावण्याचे प्रयोजन आहे. प्रस्तावित प्रकल्पात वीज निर्मिती उसाचे चिपाडे वापरुन सहविद्यूत यंत्राव्दारे केली जाणार आहे.

## ३.प्रकल्प अभ्यासाचा कृतीकक्ष (निरीक्षण अभ्यास)

अल्ट्राटेक पुणे MoEF (मिनिस्टरी ऑफ इनवॉरमेंटल ॲन्ड फॉरेष्ट ) व नॅबेंट यांच्या मान्याताप्राप्त संस्थेस एम. के. डब्ल्यू. बायोसिस्टीम पुणे यांच्या मार्फत मेसर्स.श्री.श्रीगोंदा सहकारी साखर कारखाना लि. कडून पर्यावरणीय अधात मुल्यांकन अहवाल हा पर्यावरण आणि वन मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दि. १४ सप्टेंबर २००६ च्या अधिसुचनेनुसार व विशेषज्ञ पर्यावरण मुल्यांकन समिती, महाराष्ट्र शासन हयांच्या मार्गदर्शकानुसार तयार करण्यात आलेला आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व विशेषज्ञ पर्यावरण मुल्यांकन समिती, महाराष्ट्र शासन यांचेकडुन प्रस्तावित कारखान्याचे सहविद्यूत निर्मिती प्रकल्पास ना हरकत प्रमाणपत्र मिळविण्यासंबंधीचे कार्य दिलेले आहे. पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल संदर्भात विविथित ठिकाणी पर्यावरणीय घटकांचा अभ्यास करुन प्रतिकूल परिस्थिती तथा परिणामाचे शमन करण्यासंबंधीचे व उपाय सुचविण्यासाठी हा अहवाल तयार करण्यात आलेला आहे.

## ४.प्रकल्प खर्च तपशील

२६ मेगा वॅट विदयुत निर्मिती प्रकल्पासाठी एकूण किंमत १३,०४३.५० लाख इतकी आहे,तपशील खालीलप्रमाणे.

(सर्व आकडे लाखांमध्ये आहेत.)

| क्र. | तपशील | एकून |
|---|---|---|
| १ | जमीन सपाटीकरण व आधुनिकीकरण | १०.०० |
| २ | सीव्हील कामे | ४३०.९० |
| ३ | मशिनरी व प्रकल्प | १०७६७.४८ |
| ४ | पूर्व | ६७६.५४ |
| ५ | विदयुत वाहिनी टॉवर्स | ७००.०० |
| ६ | आकस्मिक येणारा खर्च | २७१.८३ |
| ७ | मार्जीन मनी | ६२.०० |
| ८ | ऐनवेळचा खर्च | १००.०० |
| ९ | देखरेख खर्च | २४.७५ |
| | **एकून** | **१३,०४३.५०** |

## ५. प्रस्तावित स्थळाची प्रमुख वैशिष्टे :-

| अ. क्र. | विशेष वर्णन | तपशील |
|---|---|---|
| १ | स्थळ | मौजेः श्रीगोंदा फॅक्टरी (४१३ ७२६), तालुकाः श्रीगोंदा, जि.अहमदनगर, महाराष्ट्र. |
| २ | अक्षांश | १८°,३५' ,२२.८१° उत्तर |
| ३ | रेखांश | ७४°,३७' ,२१.१७° पूर्व |
| ४ | प्रकल्प स्थळाचे क्षेत्रफळ | ८० एकर (बांधकाम क्षेत्र २० एकर) |
| ५ | प्रकल्पाची निर्माण क्षमता | २६ मेगावॅट सहविदयुत निर्मिती |
| ६ | प्रकल्प स्थळाजवळचे शहर | श्रीगोंदा १० कि.मी. आणि बारामती ६० कि.मी. |
| ७ | तहशिल | श्रीगोंदा १० कि.मी. |
| ८ | जिल्हा | पुणे ९५ कि.मी. अहमदनगर ६० कि.मी. |
| ९ | पाण्याचे उदभव ठिकाण | भिमा नदी ११.४० कि.मी. |
| १० | सर्वात जवळचा राज्य महामार्ग | पुणे सोलापूर हायवे क्र.एम.एच.९. कारखान्यापासून २३कि.मी. |
| ११ | सर्वात जवळचे रेल्वे स्टेशन | श्रीगोंदा रेल्वे स्टेशन २.५ कि.मी. |
| १२ | सर्वात जवळचे विमानतळ | पुणे विमानतळ १०४ कि.मी. |
| १३ | धार्मिक तथा ऐतिहासिक स्थळ | १० कि.मी. परिसरात नाही . |
| १४ | वीज वहन व्यवस्था | महावितरण श्रीगोंदा वीज वहन उपकेंद्र कि.मी. |
| १५ | पुरातत्व स्मारक | १० कि.मी. त्रिज्येच्या परिसरात नाही. |
| १६ | संरक्षित वन | १० कि.मी. त्रिज्येच्या परिसरात नाही. |

## ६. प्रस्तावित प्रकल्पाची प्रमुख वैशिष्टे :-

| अ. क्र. | विशेष वर्णन | तपशील |
|---|---|---|
| १. | प्रकल्प | प्रस्तावित २६ मेगावॅट सहविदयुत निर्मिती |
| २. | प्रकल्पाच्या उपयुक्ततेची मोजणी | प्रथम वर्ष ८५ टकके , व्दित्तीय वर्ष ९० टकके , तृतीय वर्ष ९०टकके क्षमता असणार आहे. |
| ३. | कारखान्याची निर्माण व्यवस्था | पब्लिक लिमिटेड |
| ४. | कामकाजाचे दिवस | हंगामी कालावधी : १६० दिवस<br>बिगर हंगामी : ७४ दिवस |
| ५. | उत्पादन क्षमता | हंगामी कालावधी : २० मेगावॅट<br>बिगर हंगामी : २६ मेगावॅट |
| ६. | कच्चा माल व त्याच्या उपलब्धतेची साधणे | कच्चा माल : बगॅस<br>स्त्रोत : कारखाना |

| | | | |
|---|---|---|---|
| | | कच्चा मालाची आवश्यकता<br>हंगामी कालावधी : २३६००० मे. टन<br>बिगर हंगामी : १०९१५० मे. टन | |
| ७. | उत्पादनासाठी विजेची गरज तथा आवश्यकता | युनिट | हंगामी कालावधी |
| | | साखर | १५० kw |
| | | सहविदयुत प्रकल्प | १५०० kw |
| ८. | बॉयलर क्षमता | १×१४० टन प्रति दिन | |
| ९. | पाण्याची गरज व स्त्रोत | हंगामी कालावधी :<br>बिगर हंगामी :<br>स्त्रोत : भिमा नदी | |
| १०. | थंड प्रणाली | हवा नियंत्रित वाफेचे पाणी करणारे यंत्र | |
| ११. | प्रकल्पाची मुळ किंमत | १३०४३.५० लाख | |

## ७. प्रकल्पाच्या गरजा

### ७.१ प्रकल्पासाठी जमिनीची आवश्यकता

कारखान्याची एकूण जमिन ८० एकर असून त्यापैकी ४६ एकर जागेचा वापर औद्योगिक कारणासाठी २० एकर हरीत पट्टा निर्मिती व १४ एकर मोकळी जमिन असेल. केंद्रिय विद्युत प्राधिकरण अधिनियम १७ नुसार प्रस्तावित प्रकल्पासाठी लागणारी जमिन पुरेशी आहे.

### ७.२ वीज निर्मिती करण्याच्या पध्दतीचे वर्णन

साखर तयार करण्यासाठी ऊस हा प्रमुख कच्चा माल म्हणुन वापरला जातो आणि त्याचा ऊसाच्या रसापासून तयार केली जाते. उसाच्या चिपाडाचा उपयोग इंधन म्हणून केला जातो. उसाच्या चिपाड बॉयलरमध्ये वापरुन वाफ तयार केली जाते. ही वाफ वापरुन रस घट्ट केली जातो तसेच वाफेचा उपयोग विजनिर्मितीसाठीसुध्दा केली जातो. साखर कारखान्यात कमी दाबाचे बॉयलर्स वापरले जातात. सदर वाफ टरबाईनमधून जात असताना कारखान्यासाठी आवश्यक वीज निर्मिती होऊ शकते. अशा प्रक्रियेला को जनरेशन असे नाव दिले गेले आहे. या प्रकल्पामध्ये उच्च दाबाचे बॉयलर्स आणि वाफेवर चालणारे टरबाईन सुध्दा बसविण्यात येणार आहेत. निर्मित वीज कारखान्याच्या प्रकियेत वापरुन ज्याद वीज ही राष्ट्रीय वीज पूरवठा करणारया संस्थांना दिली जाईल.

### ७.३ कच्चा मालाची आवश्यकता

बगॅस (उसाचे चिपाड) हे वीज निर्मितीसाठी प्रमुख स्त्रोत आहे. प्रस्तावित को जेन पावर बॉयलरसाठी एकुण २३६००० मेट्रीक टन बगॅस (उसाचे चिपाड) हंगामी कालावधी (१६० दिवस) मध्ये २६ मेगावॉट वीज निर्मितीसाठी लागणार आहे तर बिगर हंगामी कालावधी (७४

दिवस) साठी १०९१५० मेट्रीक टन बगॅस (उसाचे चिपाड) २६ मेगावॉट वीज निर्मितीसाठी वापरण्यात येईल.

### ७.४ पाण्याची आवश्यकता

भिमा नदी जवळच असल्याने पाण्याची उपलब्धता असणार आहे. धरणातुन पाणी उपसा करुन ११.४० कि.मी. अंतरावर असलेल्या कारखान्याच्या जागी आणुन हौदात साठविण्यात येईल. हंगामी कालावधी पाण्याची गरज ६३ घनमीटर प्रतितास व बिगर हंगामी कालावधीमध्ये ९७ घनमीटर प्रतितास असेल. त्याचबरोबर कारखान्याच्या परिसरात शेततळे तयार केलेली आहेत त्याचा वापर कारखान्याची गरज भागविण्यासाठी करण्यात येईल.

## ८.० पर्यावरणीय तपशीलवार अभ्यास

कारखान्याच्या आजूबाजूच्या १० कि. मी. परिसरात प्रस्तावित प्रकल्पामुळे वातावरणावर प्रभाव होऊ नये म्हणूनच कारखान्याच्या परिघातील अभ्यास केला गेला आहे. भारतीय सर्व्हेक्षण विभागाच्या टोपोशिट क्रं. इ ४७ जे/ १० मध्ये प्रकल्प स्थळ व १० कि मी त्रिज्येचा परिसर येतो. प्रकल्पाचे स्थळ मौजेः श्रीगोंदा फॅक्टरी (४१३ ७२६), तालुकाः श्रीगोंदा, जिण्अहमदनगर, महाराष्ट्रण येते आहे. प्रस्तावित प्रकल्पामुळे कारखान्याच्या सभोवतालच्या पर्यावरणावर होणारया अपेक्षित प्रभावाच अभ्यास केला आहे. या अभ्यासात हवेची गुणवत्ता, पाण्याची गुणवत्ता, मातीची गुणवत्ता, ध्वनीची तिव्रता, परिसरातील वनस्पती व प्राणी इ. विषयांचा अभ्यास केला गेला आहे.

### ८.१ मुलभुत पर्यावरण

अभ्यास स्थळाचा परिस्थितीकी अभ्यास दि. १ मार्च २०१४ ते ३१ मार्च २०१४ या कालावधीत करण्यात आला. या परिसरातील वातावरण उन्हाळयात तप्त आणि शुष्क असते. हा कालावधी मान्सुन येण्याच्या अगोदरचा आहे. जून ते सप्टेंबर दरम्यान या क्षेत्रातील वातावरण ओले तर हिवळयात थंड असते. अहमदनगर जिल्हातील सरासरी पर्ज्यन्यमान ५०० मिलीमीटर असुन जून ते सप्टेंबरच्या दरम्यान पावसाचे प्रमाण अधिक असते. उन्हाळयातील उच्चात्तम तापमान ४२ अंश सेल्सिअस असते. हिवाळयातील रात्रीचे नीचतम तापमान १७ अंश सेल्सिअस असते. महिन्याभरातील सापेक्ष आर्द्रता ३६ ते ९१ टक्के पर्यतच्या कक्षेत आढळली.

### ८.२ हवा गुणवत्ता अभ्यास

भारतीय हवामान विज्ञान विभागाकडून मिळालेल्या प्रादेशिक हवामानाच्या नोंदीचा उपयोग प्रामख्याने अभ्यास क्षेत्रातील हवेची प्रमुख दिशा ठरविण्यासाठी करण्यात आला.येथील हवेचा प्रवाह अभ्यासाच्या दृष्टीने लक्षणिय महत्वाचा ठरला आहे. कारखान्यात स्वयंचलित हवामान मोजणी मापक यंत्र बसवून माहे १ मार्च ते ३१ मे २०१४ या कालावधीमध्ये हवामानासंबधी माहिति गोळा करण्यात आली.

भारतीय हवामान विज्ञान विभागाकडून प्राप्त माहितीनुसार अधिकतम तापमान एप्रिल ते मे महिन्याच्या दरम्यान असते व न्युनतम तापमान डिसे.जाने. मध्ये अढळते.परिक्षणा दरम्यान

अधिकतम ४० अंश से.न्युनतम १९ अंश से. तापमान होते. सरासरी वार्षिक पर्जन्यमान हे ५०० ते ६०० मि.मि.होते व अधिकतम पाऊस हा सप्टेंबर महिन्यात होता.

हवा गुणवत्ता चाचणीची स्थळे

| अ.क्र. | स्थळ | प्रकल्प स्थळापासूनचे अंतर (किमी) |
|---|---|---|
| १ | प्रकल्प स्थळ | |
| २ | मुंढेकरवाडी | ५.५ |
| ३ | चोरमलवाडी | ४.५ |
| ४ | बाबुर्डी | ९.३ |
| ५ | धोकराईमाला | ९.९ |
| ६ | म्हातरपिंपरी | ४.७ |

हवा गुणवत्तेचा अभ्यास प्रकल्पस्थळापासून १० किमी त्रिज्येच्या परिसरात सहा ठिकाणी करण्यात आला.प्रकल्प क्षेत्रमध्ये धुलिकण PM१० आणि PM२.५ चे प्रमाण २४ तासाच्या अवधीमध्ये मोजताना असे आढळले की सरासरी ६७.९३ मायक्रोग्रॅम/मीटर$^{३}$ आढळले.धुलिकण मुंढेकरवाडी या ठिकाणी रहदारी व इतर कारणांमुळे मोठया प्रमाणात आढळले. तसेच प्रकल्पाच्या आजुबाजूच्या परिसरात सल्फरडायऑक्साइड, ऑक्साइडस ऑफ नायट्रोजन यांचे प्रमाण अनुक्रमे ४९.२४ मायक्रोग्रॅम/मीटर$^{३}$ व ४८.०७ मायक्रोग्रॅम/ मीटर$^{३}$ असे आढळून आले आहे. या पातळया राष्ट्रीय परिवैशी वायू गुणवत्ता मानकांनुसार मान्य मर्यादित असल्याचे आढळून आले. हायड्रोकार्बन संयुक्तता निर्धारीत पातळीपेक्षा खूपच कमी आढळली.

**८.३ ध्वनी परिस्थिती:-**

ध्वनी प्रदूषणाबाबत एक पूर्व आढावा घेण्यात आला ज्यात कारखाना परिक्षेत्रात ध्वनीप्रदूषण किती प्रमाणात आहे याची तपासणी करण्यात आली आहे त्यामध्ये वेगवेगळया प्रकारचे ध्वनी परिणाम आढळले. औघोगिक परिसर, आणि वाहतूक रस्ते यापासून येणारा ध्वनी तसेच संवेदनशील भाग जसे हॉस्पिटल, शाळा यांच्यापासून निर्माण होणारे ध्वनी तपासले व प्रस्तावित प्रकल्प स्थळाची ध्वनी पातळी निश्चित केली.

अभ्यास क्षेत्रातील २४ तासाच्या संबंधी निरीक्षणे अभ्यासण्यात आली. या कालावधीत प्रकल्प क्षेत्रातील ध्वनी पातळी ४७.१४ डेसिबल ते ६८.० डेसिबल अशी नोंदली गेली. राष्ट्रीय पर्यावरण गुणवत्ता मानकानुसार अधिकतम पातळी ७५ डेसिबल असून त्या तुलनेत प्रकल्पस्थळी ध्वनी पातळी मर्यादित असल्याचे आढळून आले.

**८.४ पाणी परिस्थिती:-**

प्रस्तावित प्रकल्पा भोवतालच्या१०किमी परिसरातील पाण्याचे नमुन तपासले यात २ नमुने जमिनीवरील पाण्याचे घेतले आणि पाच नमुने जमिनीखालील पाण्याचे तपासले गेले.या पाणी चाचणीत पाणी दूषित असल्याचे आढळले नाही.

सदर प्रकल्पापासून ११.४० किमी अंतरावर असलेल्या भिमा नदीतून प्रकल्पापर्यंत पाणी आणण्याचे ठरले त्याकामी कारखान्याचे पाणी पुरवठा विभागाकडून सदर पाणी मिळणेकामी परवानगी मिळाली आहे.

**८.५ माती परिस्थिती:-**

कारखाना परिसरातील जमिन ही उस लागवडीसाठी योग्य आणि पाण्याचा भरपूर निचरा करणारी आढळली परिक्षणा दरम्यान माती मध्ये अन्नद्रव्यांची गरज असल्याचे आढळले.अभ्यास क्षेत्रातील शेती मुख्यात पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे. परिसरात मुख्यतःऊस, बाजरी, ज्वारी, तूर, मूग इत्यादी पिके घेतली जातात. खुरटया वनस्पती परिसरात आढळतात.

**८.६ जैव पर्यावरण :-**

कारखाना परिसरातील वनस्पती आणि प्राणी यांचा अभ्यास मार्च २०१४ रोजी करण्यात आला. पानझडी व मोकळी खुरटया वनस्पतीचा प्रदेश असुन परिसरात अभ्यासादरम्यान ३२ प्रकारच्या वनस्पती, सस्तन प्राणी १० ,उभयचर व सरपटणारे प्राणी १२, २६ प्रकारचे पक्षी इत्यादी नोंद करण्यात आली. करवंद,आंबा,लिंब,जांभूळ वड,उंबर ,पिंपळ,करंज, चाफा,खैर तरवड,बोर,काटेसावर व पांगारा याप्रकारच्या वनस्पती परिसरात आढळतात.

## ९ प्रकल्पांची संपूर्ण माहिती -

सध्या कार्यान्वीत असलेला साखर कारखाना ३५०० मे.टन/दिन तसेच ३० के.एल.पी.डी. आसवणी प्रकल्प कार्यान्वीत आहे त्याचबरोबर विज निर्मिती २६ मे.वॅट करण्याचे योजिले असून,कारखान्यापासून २० कि.मी.च्या परिसरामध्ये असणारा कच्चा माल ऊस उपल्बध असून त्यासाठी लागणारे पाणी,विघुत,जागा व मनुष्यबळ खालीलप्रमाणे.

**९.१ पाणी पुरवठा:-**

प्रस्तावित प्रकल्पासाठी ११.४० कि.मी.अंतरावर असणाऱ्या भिमा नदीतून पाण्याचा पुरवठा होणार आहे.त्याकामी योग्य ती परवानगी इरिगेशन विभाग यांचेकडून ९८९ घनमी / दिन प्राप्त केलेली आहे.सदर प्रकल्पासाठी ७० घनमी/ तास पाणीपुरवठयाची गरज आहे.

**९.२ विघुत पुरवठा:-**

साखर कारखान्यासाठी १५० किलोवॅट,आसवणी प्रकल्पासाठी २५० किलोवॅट, इतर वापरासाठी २०० किलोवॅट,विघुत उर्जा प्रकल्पास १५०० किलोवॅट विज पुरवठा लागणार आहे.

डि.जी.सेट हे साईड बाय गरज म्हणून राखून ठेवलेली आहे.

**९.३ परिक्षेत्र विवरण:-**

सदर प्रकल्पासाठी एकूण जागेचे क्षेत्र ८० एकर असून सध्या एकूण ६५ एकर जागा वापरात असून कारखान्याकडे १५ एकर जागा प्रस्तावित प्रकल्पासाठी राखीव ठेवण्यात आलेली आहे.

| क्र. | तपशील | क्षेत्र (एकर मध्ये) |
|---|---|---|
| १ | वृक्षारोपन | २० |
| २ | श्रस्ते | ४ |
| ३ | पार्कींग | ४ |
| ४ | ठमारती | २० |
| ५ | पाणतळी | ३ |
| ६ | विस्तारित प्रकल्पासाठी जागा | १५ |
| ७ | मोकळी जागा | १४ |
| | **एकूण** | **८०** |

**९.४ आवश्यक मनुष्यबळ :-**

सदर प्रकल्पासाठी लागणारे मनुष्यबळ खालीलप्रमाणे

| क्र. | तपशील | कामगार |
|---|---|---|
| १ | कामकरणारे लोक | २४ |
| २ | प्रशासकीय कामे | १६ |
| | एकूण | ४० |

**९.५ कच्चा मालः-**

साखर कारखान्यासाठी लागणारा प्रमुख्य कच्चा माल ऊस हा प्रामुख्याने कारखान्यापासून असलेल्या जवळपासच्या परिसरात उपल्ब्ध असून त्यानंतर विज प्रकल्पाला लागणारा कच्चा माल कारखान्यामध्येच निर्माण होणार आहे.तपशील खालीलप्रमाणे,

| अ.क्र. | कच्चा माल | प्रमाण | वाहतूक व्यवस्था | साठवण्यासाठी उपाययोजना |
|---|---|---|---|---|
| १. | विज प्रकल्पास लागणारा बगॅस ऊसाचा रस ३० टक्के. | १४७५ टि.सी.डी ३२९ | साल्ट /बेल्ट कनव्हेअर | बगॅस यार्ड |
| २. | उत्पादन आणि उपउत्पादन | | | |
| अ. | बॉयलरची राख | २२ टन/दिन | ट्रॅक्टर | कंस्ट्रक्टेड यार्ड |
| ब. | शिल्लक गाळ | नाही | — | |

९.६ प्रक्रिया तपशील :-

अ)विज प्रकल्प प्रक्रिया तपशील :-




## १०) पुनर्वसन आणि इकॉलॉजी -

विज प्रकल्प हा साखर कारखान्याच्या परिसरातच उभारण्याचे आसल्यामुळे पुनर्वसन करण्याची काहीही गरज नाही. तिथे पुरातन वास्तू व पर्यटन स्थळे वगैरे काहीही नाही. १० कि. मी. च्या परिघामध्ये राष्ट्रीय प्राणी संग्राहलय,वनीकरण वगैरे काहीही नाही. ऊस, तुर, गहू,भुइमूग, बाजरी ही पीके प्रामुख्याने घेतली जातात.

## ११ पर्यावरणीय परिणाम आणि उपायः-

या कारखान्यामुळे पर्यावरणीय परिणाम व व्यवस्थापन हे नैसर्गिक अवस्था व कारखान्याच्या कामकाजाची पध्दत व प्रदुषण नियंत्रित यांवर अवलंबून आहे.कारखान्यामार्फत उत्तोमत्तम पर्यावरणीय व्यवस्थापन प्रणाली अवलंबण्यात येईल त्यामुळे प्रदुषणाचे प्रमाण मर्यादित राखण्यात मदत होईल. प्रस्तावित प्रकल्पामुळे सभोवतालच्या पर्यावरणावर दोन टप्यात परिणाम होऊ शकतो.उदा.१.बांधकाम टप्यातील पर्यावरणीय प्रदूषण २.कारखान्याच्या परिचालन टप्यातील पर्यावरणीय प्रदूषण.

### ११.१ प्रकल्पामुळे हवेवर होणारे परिणाम :-

हवा प्रदुषणाचा मुख्य उगम हा प्रामुख्याने बॉयलर मधून जळून निघालेली राख ही आसते. ती चिमणीवाटे बाहेर फेकली जाते. चिमणीची उंची साधारणपणे ७० मी.एवढी असून ही उंची केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळ यांच्या नॉर्मस् प्रमाणे ठेवण्यात अलेली आहे. शिवाय चिमणीस सुक्ष्म स्क्रबर व इ.एस.पी (इलेक्ट्रौस्टॅटीक प्रेसिपीटेटर) बसविण्याचे योजले आहे. त्यामुळे एकूण निघणारी राख ही १३०-१५० $Mg/Nm^3$ प्रति दिन आसेल. राखेमध्ये अर्धवट जळालेला भूसा व कार्बन याचे प्रमाण आसते. आणि ती गंधकापासून मुक्त असते. जेणेकरुन प्रदूषण होणार नाही याची काळजी घ्येण्यात आलेली आहे.

### ११.२ प्रकल्पामुळे पाण्यावर होणारे परिणाम :-

विघुत प्रकल्पामुळे ६८९ घनमी/दिन पाण्याची उलाढाल होणार आहे. हया मध्ये पाण्याचे फक्त तापमान बदलते अन्य कोणत्याही गुणधर्मात जास्त बदल होत नाही.आणि कुलिंग टॉवरचा वापर केल्याने हे बदललेले तापमान आटोक्यात आणले जाते आणि पाण्याचा पुर्नःवापर केला जातो.विघुत प्रकल्पामुळे एकच घनकचरा बाहेर पडतो ती म्हणजे राख.त्याची पण योग्य ती विल्हेवाट लावली जाते. परंतु सदर पाणी वापराने किंवा प्रवाहाने कुठल्याही प्रकारची बाधा निर्माण होणार नाही.वापर झालेले पाणी हे एम. पी. सी. बी. च्या मर्यादांना आधीन राहुन योग्य मार्गाने त्याचा निचरा केला जाईल.

**पाणी व्यवस्थापनः-**

| क्र. | घटक | एकूण प्रकल्पासाठी लागणारे पाणी (घनमी/दिन) | वयाजाणारे पाणी | एकूण प्रकल्पातून निघणारे पाणी (घनमी/दिन) |
|---|---|---|---|---|
| १ | बॉयलर | फ्रेश पाणी ३५० | १५० | ETP चे संरक्षित केलेले पाणी २०० |
| २ | कुलींग टॉवर | पूर्नवापर -३०० फ्रेश २१० | ४७० | ETP चे संरक्षित केलेले पाणी ४० |
| ३ | प्लोअर / व्हेसल वॉशिंग | फ्रेश १५ | २ | ETP चा मॉडरेट 13 |
| ४ | रिजनरेशन डि मिनरलायजेशन | फ्रेश ८ | १ | ETP चा मॉडरेट BOD 7 |
| ५ | पंप ब्लोअर्स सिलींग वॉटर | फ्रेश १०० | ३ | ETP चे संरक्षित केलेले पाणी ९७ |
| ६ | Domestic use | फ्रेश ६ | १ | To septic tank |

विघुत निर्मिती प्रकल्पासाठी लागणारे पाणी

एकून प्रकल्पासाठी लागणारे पाणीः-

१)प्रकल्पासाठी = ९८९ घनमी /दिन

एकूण= ९८९घनमी /दिन

एकूण प्रकल्पातून निघणारे पाणी

१)लांस प्रकल्पातून = ६२७ घनमी /दिन

२)सोबर = ३३७ घनमी /दिन

३)मॉडरेट = २५ घनमी /दिन

एकूण= ९८९ घनमी /दिन

सोबर आणि मॉडरेट पाणी ३३७+२५=३६२ घ.मी./दीन हे ई.टी.पी.मध्ये सोडून प्रक्रीया करुन ते पाणी पूर्नवापरासाठी वापरले जाईल.

**११.३ घनकचरा निर्मिती व व्यवस्थापनः-**

घनरुपात निघणारा कचरा हा प्रामूख्याने राख असते. ही राख फिल्टर मटेरियल म्हणून जैवीक प्रक्रिया साठी किंवा विट निर्मितीसाठी वापरली जाते. त्यामुळे निघणारी सर्व राख वापरली जाणार आहे.

| **कचरा स्त्रोत** | **संख्या** | **प्रक्रिया** | **विल्हेवाट** |
|---|---|---|---|
| कॅटीन व कॉलनी | १० किलो प्रतिदिन | खत | बागेसाठी |
| ईटीपी स्लज | १२ कि.ग्रा.प्रतिदिन | खत | विक्री |
| स्वच्छता | २० कि.ग्रा.प्रतिदिन | विभाजन | विक्री |
| बागेतील कचरा | २० कि.ग्रा.प्रतिदिन | एकत्रीकरण | खत |
| बॅरल | ३ नग प्रति महिना | एकत्रीकरण | पुनर्ववापरासाठी |
| राख | १२ टन प्रतिदिन | गोळा करणे | खतासाठी / विट निर्मितीसाठी |
| स्पेंन्ट ऑईल | १० कि.ग्रा.प्रतिदिन | गोळा करणे | बॉयलरसाठी |

**११.४ पर्यावरणात्मक बदलांवरील कृती कार्यक्रमः-**

कारखान्यातील कामकाजा दरम्यान पर्यावरणाच्या हालचालींवर लक्ष केंद्रीत करणे व त्याअनुषंगाने कार्यात बदल वा सुधारणा करणे अगत्याचे व महत्वाचे असते.याबाबत कारखान्यात काम चालू असताना घ्यावयाची खबरदारी,करावयाची उपाययोजना व कार्यवाहीची माहिती ठराविक असणे गरजेचे आहे. योग्य पध्दतीने केलेले निदान केव्हांही पर्यावरणाच्या सुरक्षिततेची बाब ठरते. पर्यावरणाच्या हालचालींवर लक्ष केंद्रीत करणे हे प्रदुषण कमी करण्यासारखेच महत्वाचे कार्य असून त्याव्दारे योग्य तो उपाय वा निर्णय आपण घेऊ शकतो.

**११.६ गॅसेस (वायू)नियंत्रणः-**

बॉयलर स्टॅकमधून आर एस पी एम, एस पी एम, एन ओ एक्स आणि एस ओ२ सारखे गॅसेस निघतात ते नियंत्रित करणे.त्याकामी सीपीसीबी चे निर्देश अंमलात योजिले आहे.

**११.७ बंदिस्त हवेची गुणवत्ताः-**

वाऱ्याची गती,दिशा तसेच गतीत होणारा बदल,बातावरणातील हवेचा दाब,कोरडया आणि ओलसर वातावरणातील तापमान इ. हवेतील घटक आणि आर्द्रता व पावसाचे प्रमाण इ.चे यथोचित मोजमाप व्हायला हवे.ठराविक स्थानावरुन बंदिस्त हवेची गुणवत्ता तपासली जाईल. स्वच्छ पाणी आणि खराब पाणी गुणवत्ता तपासणे.

प्लांटमध्ये वाहणाऱ्या पाण्याच्या अनेक प्रवाहावर नियंत्रण असायला हवे.तसेच सदर पाण्यातील आम्लीय व अल्कलीय गुणधर्म, धातुचे प्रमाण वेळोवेळी तपासले जावे.कंपोस्ट यार्डात खोलवर जाणारा पाण्याचा प्रवाह तसेच खालून वर येणारा पाण्याचा प्रवाह नियमित तपासला जावा.

**पोस्ट प्रोजेक्ट नियोजन वेळापत्रक**

प्रक्रियेनंतर निर्माण होणारे खराब पाणी, प्लु गॅसेस हे वातारणात मिसळतात त्याबाबत पर्यावरणीय परिक्षण करावयाचे वेळापत्रक बनवण्यात आले आहे. जसे बंदिस्त हवेची गुणवत्ता, जमीनीखालील पाणी आणि माती इ. याबाबत विस्तृतपणे पुढे नमुद केलेले आहे.

| क्र. | तपशील | ठिकाण | फ्रिक्वेन्सी |
|---|---|---|---|
| १ | एसपीएम,आरपीएम . एस.ओ.२ आणि एन. ओ.एक्स | अ)खालच्या दिशेने जाणाऱ्या हवेचे २ नमुने (५०० व १००० मीटर) ब)वरच्या दिशेने जाणारा हवेचा १ नमुना (५०० मिटर) | २४ तास सॅम्पल सहामाही |
| २ | चिंमणीतून निघालेल्या फलु गॅस-एस.पी.एम. एस.ओ.२ व एन.ओ. एक्स चा फलो-रेट | चिंमणीच्या वरील भागात(धुर बाहेर पडण्याचे ठिकाण) | मासिक |
| ३ | वाऱ्याची गती व दिशा | कार्यस्थळी | हप्त्याने |
| ४ | तापमान (कमी /जास्त) आर्द्रता (कमी/जास्त) पावसाचे प्रमाण | कार्यस्थळी कार्यस्थळी कार्यस्थळी | |
| ५ | जमिनीवरील पाणी | कंपोस्ट यार्डातून १ कि.मी.परिघात वॉश टॅकवर खर्च झालेले पाणी. खालच्या दिशेने जाणारे २ ठिकाणावरील पाणी आणि वरच्या दिशेने जाणारे १ ठिकाणावर पाणी हे कार्यस्थळाच्या भोवतालच्या१०कि. मी.पर्यंत | स्हामाही |
| ६ | नदीचे पाणी (पिण्यायोग्य गुणवत्तेचे) | नदीतून येणारा व नदीत जाणारा प्रवाह प्रत्येक १ नमुना | हप्त्याने |
| ७ | मातीतील जैवीक व प्रतिजैविके तपासणे | कंपोस्ट खत वापरतांना ३ ठिकाणाहून प्रवाही पाण्याचे नमुने | मान्सून पूर्व व नंतर |
| ८ | खराब पाणी | कार्यस्थळी | प्रतिदिन |
| ९ | जैवीक खत | कार्यस्थळी | आठवडयाने |

## १२.) पर्यावरण व्यवस्थापन योजनाः- (EMP)

पर्यावरण व्यवस्थापन योजना ही प्रकल्प भागातील अतिशय महत्वपूर्ण बाब आहे. व्यवस्थापन योजनेचा मुख्य उददेश हा अद्ययावत परवडणारे योग्य तंत्रज्ञान वापरुन प्रकल्प परिसरातील प्रद्रूषण नियंत्रण करणे हा आहे

प्रस्तावित प्रकल्पाच्या यशस्वीतेसाठी पर्यावरणाचा अभ्यास करुन पर्यावरणाचा प्रकल्पांवर होणारा परिणाम रोखण्यासाठी त्यावर उपाययोजना म्हणून आणि पर्यावरणापासून पूर्वी झालेल्या आघातांचा आढावा घेऊन सदर अनुकूल अशी पर्यावरण व्यवस्थापन योजना तयार करण्यात आलेली आहे.सदर योजनेतील बाबी हया प्रकल्प उभारणेपूर्वी आणि नंतर अशा दोन्ही परिस्थितीत लागू केल्या जातील तसेच सदर योजना कार्यान्वीत करुन त्यावर अंमल करणेकामी त्यात प्रकल्प व्यवस्थापनाचा प्रत्यक्ष सहभाग राहील.

पर्यावरण सेल

अध्यक्ष व व्यवस्थापकी संचालक

व्यवस्थापक (ईएचएस)

व्यवस्थापक (देखभाल दुरुस्ती)

सामान्य प्रशासन (साखर कारखाना)

## १२.१ पर्यावरणीय व्यवस्थापन आराखडा व खर्च

पर्यावरण व्यवस्थापन योजनेमध्ये पर्यावरणावरील दुष्परिणाम कमी करण्यासाठी संरक्षण व संवधर्नाच्या उपाय योजना राबविण्यात येतील. त्यासठी कारखान्याचे व्यवस्थापन मंडळ वेळोवेळी आवश्यक ती उपाययोजना राबवतील. यामुळे वातावरणामध्ये होणारे परिणाम नगण्य होण्यास मदत होईल.

केंद्रिय प्रदुषण नियंत्रण मंडळाने तयार केलेल्या नियमानुसार कारखान्याचे प्रदुषण नियंत्रण यंत्रणा कार्यान्वित केली जाईल. सहविघुत प्रकल्प तसेच साखर कारखान्याव्दारे उत्सर्जन संदर्भात कारखान्याच्या व्यवस्थापकीय मंडळाव्दारे एक विशिष्ट मर्यादा घालून दिलेली आहे.यासाठी पर्यावरण आरोग्य व सुरक्षा अधिकारी या पदावर योग्य अशा उमेदवाराची निवड केली जाईल. या अधिकाऱ्याच्या मार्फत होणारे संभाव्य प्रदुषण नियंत्रणात आणण्यासाठी योग्य ती काळजी घेतली जाईल.

## १२.२ बांधकाम टप्यातील पर्यावरण व्यवस्थापन योजना

बांधकाम सुरु असताना धुलिकण, सल्फरडाय ऑक्साईड नायट्रोजन ऑक्साईड आणि कार्बनची संयुगे हयांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असते. धुलिकणांच्या नियंत्रणासाठी बांधकामाच्या ठिकाणी पाण्याचा फवारा सतत करण्यात येईल. कारखाना परिसरात तसेच क्षेत्राबाहेर कोणत्याही प्रकारचे प्रदुषण व परिणाम होणार नाही याची योग्य ती दखल घेण्यात येईल.

कारखान्याच्या बांधकाम टप्यात काम कारणाऱ्या कामगारांना योग्य त्या सोयी सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातील. यामध्ये प्रामुख्याने पिण्याचे पाणी,मल विसर्जन आरोग्य रक्षक सुविधा मजुरांना बांधकाम स्थळी तात्पुरती राहण्याची व्यवस्था, सांडपाणी वहन व्यवस्था तसेच कामागारांना घरगुती वापरासाठी इंधन व्यवस्था केली जाईल.

### १२.२.१ सामाजिक बाजू

- कारखान्याच्या बांधकाम टप्यात तसेच परिचालन टप्यात स्थानिक लोकांना रोजगाराची संधी उपलब्ध होतील.
- उपलब्ध होणाऱ्या रोजगाराच्या विविध संधीमुळे त्यांच्या स्थलांतराचा वेग कमी होऊन विविध सेवा या निमित्ताने सुरु होतील.
- सामाजिक सुसंस्कृतपणा वाढेल
- वाहतूक व्यवस्थेत वाढ होऊन संदेशवहन परिस्थितीमध्ये सुधारणा होतील
- व्यापारी क्षेत्रात वाढ होऊन त्यांस अनुसरुन छोटेमोठे व्यवसाय सुरु होतील
- प्रकल्पाच्या बांधकाम तसेच परिचलन टप्यात उपलब्ध होणाऱ्या रोजगाराच्या संधीमुळे बाहेरील लोकांची वाढ अपेक्षित असून हे प्रमाण तात्पुरत्या स्वरुपाचे असेल.

## १३.परिचालन टप्प्यातील पर्यावरणीय व्यवस्थापन

### १३.१ वायु प्रदुषण

प्रामुख्याने बॉयलर मधुन PM१० आणि PM२.५, सल्फरडाय ऑक्साईड,नायट्रोजन ऑक्साईड या प्रदुषण करणाऱ्या प्रदुषकांचा प्रादुर्भाव होतो.हया घटकांचा परिणाम कमी करण्यासाठी पुढील उपाय योजना अंमलात आणल्या जातील.

- केंद्रिय प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या नियमानुसार प्रस्तावित १४० टन प्रति तास बॉयलरच्या धुराडयांची उंची ७० मीटर असेल
- प्रस्तावित १४० टन प्रति तास बॉयलरमधुन निघणाऱ्या वायु प्रदुषणांवर नियंत्रण ठेवण्यासाठी इलेक्ट्रोस्टॅटीक प्रेसीपिटेटर बसविण्यात येईल.
- वायु प्रदुषण करणाऱ्या यंत्रणेची कार्यक्षमता तपासून त्यावर योग्य ती उपाय योजना करण्यासाठी चिमणीतून निघणाऱ्या वायूच्या उत्सर्जनाचे कारखान्याव्दारे नियमितपणे परिक्षण केले जाईल तसेच बाहेरील संस्थेव्दारे सुध्दा परिक्षण करण्यात येईल.
- राख हाताळणी करताना हवेचे प्रदुषण होऊ नये यासाठी वेळोवेळी पाणी सिंचक यंत्राव्दारे अस्थिर कणांचे स्थिरीकरण करुन त्याचे नियंत्रण केले जाईल.
- कारखान्याच्या सभोवतालच्या परिसरात वृक्ष लागवड करुन हरीत पटटा निर्मिती केली जाईल.

## १३.२ ध्वनी पर्यावरण

- कारखान्यातील यंत्रसामुग्रीचे वेळोवेळी परिक्षण करुन योग्य वंगण लावून आवाजाची पातळी कमी राहील याकडे लक्ष जाईल.तसेच कंपने निर्माण करणाऱ्या यंत्रसामग्रीसाठी वेगळी व्यवस्था करुन निर्माण होणारी कंपने नियंत्रित केली जातील. त्यासाठी अशी यंत्रे बंदिस्त जागी ठेवण्यात येतील.

- कारखान्यात वापरण्यात येणारी यंत्रसामग्री उदा.कॉप्रेसर्स, STG टरबाईन्स आणि जनरेटर इत्यादीचे उत्पादन व पुरवठा पर्यावरण आणि वन मंत्रालय तसेच OHSAS च्या मार्गदर्शक तत्वानुसार बसविले जातील.

- ध्वनीची पातळी जास्त असणाऱ्या विभागामधील कामगारांच्या सुरक्षिततेसाठी कानाची संरंक्षक पटटी ,प्लग,इंडस्ट्रीयल हेलमेट आणि इतर सुरक्षित साधने पुरविण्यात येतील.

## १३.३ पाणी पर्यावरण

- प्रस्तावित प्रकल्पासाठी ९८९ मी / दिवस इतके पाणी लागेल आणि त्यातून निर्माण होणारे सांडपाणी ३६८ मी / दिवस असेल.

- पाण्याचा वापर कमीत कमी व्हावा यासाठी सतत प्रयत्न करण्यात येतील ज्यामुळे निर्माण होणाऱ्या सांडपाण्याचे प्रमाण कमी होईल. पाण्याचा प्रवाह मोजण्यासाठी प्रवाह मापक यंत्रे बसविण्यात येतील व त्या प्रवाहाच्या नोंदी ठेवण्यात येतील.

- त्याप्रमाणे पाण्याचा वापर आणखी कमी व्हावा यासाठी पाणी पाणी वापराचे अंकेक्षण (ऑडीट) आवर्ती (पिरीऑडीक) पध्दतीने करण्यात येईल.

- कुलिंग टॉवर बॉयलर डि.एम. प्लॅंट आणि साखर उत्पादन प्रक्रयेतून निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावर सांडपाणी प्रक्रिया केंद्रात  प्रक्रिया केली जाईल.

## १४) सामाजीक आर्थिक फायदा -

औद्योगीक प्रगती शिवाय कारखाना हा सभासद शेतकऱ्यांसाठी आणि कर्मचाऱ्यांच्या फायद्यासाठी सदैव कार्यरत असेल ते खालील प्रमाणे -

१) सभासद शेतकरी यांच्या फायद्यासाठी कारखान्यानी एस्. डी.एफ्. फंडस् (SDF) बोअर करण्यासाठी, पाईप लाईन करण्यासाठी आणि नव्या जातीची रोपे(बी) खरेदी करण्यासाठी कर्जाची व्यवस्था केली आहे.

२) कारखान्याने सभासद शेतकऱ्यांना खत व औषधे पूरवठा मुळ दरात उपलब्ध करुन देण्याचे ठरविले आहे.

३) कारखान्याने शेतकऱ्यांना चर्चासत्रमार्फत शास्त्रीय कृषी माहीती देईल व त्याच बरोबर ऊसाचे उत्पादन वाढवण्याबाबत शेतकऱ्यांना वेळोवेळी त्यांच्या शेतावर जाऊन किंवा कारखाना परिसरात चर्चासत्राचे आयोजन करुन शेतकऱ्यांना मदत करेल.

४) कारखाना शेतकऱ्यांच्या शेतीचे माती परीक्षण करुन त्याची प्रत वाढवण्यासाठी हव्या असलेल्या खतांचे मार्गदर्शन करेल.तसेच योग्य पध्दतीने कंपोस्ट खत निर्मिती करुन शेतकऱ्यांना योग्य वेळी देईल.

५) कारखाना कर्मचाऱ्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी हव्या त्या सुखसोई करुन देईल. केंद्र सरकारला एक्साईज डयुटीच्या स्वरुपात पैसा मिळेल या परिसरातील लोकांना रोजगाार उपलब्ध होईल तसेच लोकांची आर्थिक परिस्थिती सुधारेल यासाठी सदैव प्रयत्न करत राहिल.

६) कारखाना हा सभासदना लिप्ट आणि ड्रिप एरीकेशन करण्यास मदत करेल व त्यामूळे कारखान्याला लगणाऱ्या कच्च्या मालाचे (ऊसाचे) उत्पन्न कसे वाढविता येईल ते पाहण्यात येईल.

७) कारखाना विद्युत निर्मिती करुन MSEB च्या माध्यमातून भागातील लोकांना विज पुरविण्यात येईल अशा प्रकारे देशाची विद्युत निर्मितीची गरज काही प्रमाणात कमी करेल.

८) सदर औघोगिक परिसरात सघस्थिती पक्के रस्ते बांधणे व दळणवळण सुविधा विकसीत करणेकामी तसेच पेट्रोल पंपाची सुविधा पुरवणे,अग्निशमन यंत्रणा पुरवणे,बॅंक व्यवस्था निर्माण करणे,शैक्षणीक सुविधा,इस्पीतळ अशा विविध सुविध कारखान्यामुळे उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे या भागातील लोकांचे जिवनमान उंचावण्यासाठी कारखान्यामुळे हातभार लागणार आहे.

## १५) निष्कर्ष

प्रस्तावित प्रकल्पामुळे राज्याच्या विघुत निर्मितीत वाढ होईल. सदर प्रकल्पाचे अपेक्षित प्रभाव क्षेत्र अत्यंत कमी असल्यामुळे भुउपयोगावर कोणत्याही प्रकारचा परिणाम होणार नाही.प्रस्तावित औघोगिक बांधकाम शास्त्रोक्त पध्दतीने केले जाईल.त्यामुळे शेती उपयुक्त जमिनीची कसलीही हानी होणार नाही याची काळजी घेण्यात येईल.कारखान्यातून निघणारे टाकाऊ पदार्थ उदा. राख शेतातील पिकांसाठी खत म्हणून उपयुक्त आहे कारण त्यात पोटॅशिअमचे प्रमाण जास्त आहे शिल्लक राख सिमेंट व वीट उत्पादकांना पुरविण्यात येईल.

प्रकल्पातून निर्माण होणारे घटक म्हणजेच साखर विधुत जैविक खत इत्यादीचा शेतीसाठी तसेच लघुउधोगासाठी उपयोग होईल. सदर प्रकल्प परिसरातील लोंकांसाठी फायदयाचा ठरेल व शेतकऱ्यांच्या उसाला चांगला भाव मिळेल.

- सदर प्रकल्प हा टाकाऊ पदार्थाचे उपयुक्त पदार्थात उदा.वाफ विधुत जैविक खत रुपांतर करण्याच्या दृष्टीने योग्य आहे.
- येथील स्थानिक लोकांना हा कारखाना या परिसरात सुरु व्हावा असे प्रामुख्याने वाटते.
- पाणी वीज व कच्चा माल तसेच बाजारपेठ इत्यादी गोष्टी या ठिकाणी उपलब्ध असून सर्वांना सोईचे आहे.
- पर्यावरण रक्षण प्रदुषण नियंत्रण स्त्रोत संवर्धनाच्या दृष्टीने पुर्ण काळजी घेतली जाईल.
- सदर प्रकल्प हा आर्थिकदृष्टया प्रभावी आणि पर्यावरण पूरक आहे.

****************